नि.फौ.खटला क्र. ७५/२०१७
सरकार वि. शकुनतला
निशाणी क्र.४२ खाली

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ ची साक्ष शपथेवर सुरु :-

नाव : रेवती सुखदेव डोकरीमारे
वय : ६२ वर्ष, व्यवसाय : काहीनाही
राहणार : काचुरवाही, रामटेक

सरतपास शपथेवर सुरु :-
सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती रणवरे मॅडम यांच्यामार्फत :-

१) माझ्या घरासमोर सर्व आरोपी राहतात. त्यांच्यात व आमच्यात नेहमी वाद होत राहतात. घटना सन २०१६ मध्ये अंदाजे सकाळी ७ ते ८ च्या दरम्यान घडली. घटनेच्या दिवशी मी व माझी सुन घरी होती. माझे पती शेतात गेले होते व मुलगा सागर हा भाजीपाल्याच्या धंदयावर गेला होता व दुसरा मुलगा विष्णु हा डयुटीवर गेला होता. त्यावेळी माझ्या घराजवळ राहणारी एक बाई धाण साफ करण्यासाठी कामावर आली व ती म्हणू लागली की मी आता येणार नाही कारण तुम्ही चुगल्या केल्या. ती तिच्या घरी निघून गेली.

२) तेवढयात आरोपी लोक माझ्या घरी आले. त्यांनी मला विटावर आपटले व त्यामुळे मी बेशुध्द झाली. माझ्या हातावर गंभीर मार लागला. तेवढयात माझी सुन आली व ओरडली त्यामुळे तेथे लोक जमा झाले. आरोपी लोक म्हणत होते की,'हिचा जीव जाये पर्यंत मारा'. म्हणून मी पोलिस स्टेशनला जावून रिपोर्ट दिली. आता मला सदर रिपोर्ट व प्रथम छापील खबरी अहवाल दाखविण्यात आली. ते तेच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४३ व ४४** देण्यात येते. तेथून पोलिसांनी मला रामटेकच्या सरकारी दवाखान्यात उपचाराकरीता आणले. तेथून मला नागपूर येथे रेफर केले.

३) सरकारी वकीलांनी मुद्देमाल उघडल्यावर साक्षीदारांनी सांगितले की, आरोपींनी तिला चाकुने मारले. आरोपी क्र.४ ने मला डाव्या हाताच्या मनगटावर चाकुने मारले. आता मला आर्टिकल अ चाकु दाखविण्यात आला. तो तोच चाकु आहे. साक्षीदाराने ओढणी पाहून परत सांगितले की, ती ओढणी मी घटनेच्यावेळी घातली होती व आरोपीने मारल्यामुळे त्या ओढणीवर रक्त लागले होते. आता मला सदरची ओढणी दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यास **आर्टिकल ब** देण्यात येते. आरोपींना मी ओळखते. ते आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम.ए.गुप्ता यांच्यामार्फत :-

४) मला लिहता वाचता येत नाही. पोलिसांनी रिपोर्ट मला वाचून दाखविली होती.

मला शुगर, बीपी नाही. मी पोलिसांना रिपोर्ट देतांना सांगितले होते की, आरोपींने असे म्हटले होते की, माझा जीव जाई पर्यंत मारा, मला विटावर आपटले त्यामुळे मी बेशुध्द झाली. परंतु ही बाब माझ्या रिपोर्ट मध्ये का नमुद नाही याचे कारण मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे रिपोर्ट लिहली नाही.

५) हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचे घर माझ्या घरासमोर आहे व आमच्या दोघांच्या घरामध्ये सिमेंटचा १० फुटाचा रोड आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घराच्या बाजुला नाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरासमोर पाणी जमा होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरासमोरील जमा झालेल्या पाण्यामुळे माझे पाय घसरुन पडली व त्यामुळे माझ्या डोक्याला व हाताला मार लागला. आमच्या घरी मोटारसायकल आहे. काचुरवाही ते रामटेक येण्यास अर्धातास लागतो.

६) माझ्या घराच्या आजुबाजुला आशिष हटवार, दुर्गेश आयके, शालीक मोहनकर, सुभाष मोहनकर, उदयभान चाचेरे यांचे घर आहे. रिपोर्ट देण्याकरीता मी माझ्या मुलासोबत गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीं माझ्या घरी आले व त्यांनी विटावार मला आपटले त्यामुळे मी बेशुध्द पडले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.४ ने मला डाव्या हाताच्या मनगटावर चाकुने मारले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल अ सारखा चाकू प्रत्येक घरात भाजी कापासाठी असतात.

७) हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे आरोपीसोबत जुने वाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत माझे जुने वाद असल्यामुळे मी त्यांच्याविरुध्द खोटा रिपोर्ट दिला व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**माझे समक्ष,**
**सही/-**

**रामटेक.**
**दिनांक : १०/०३/२०२६.**

**(डी. सी. वोराणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**कोर्ट नं.२, रामटेक**

<u>नि.फौ.खटला क्र. ७५/२०१७</u>
<u>सरकार वि. शकुनतला</u>
<u>निशाणी क्र.४५ खाली</u>

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ४ ची साक्ष शपथेवर सुरु :-</u>**

**<u>नाव</u> : सुखदेव श्रावण डोकरीमारे**
**<u>वय</u> : ७० वर्ष, <u>व्यवसाय</u> : शेती**
**<u>राहणार</u> : काचुरवाही, रामटेक**

**<u>सरतपास शपथेवर सुरु</u>** :-
**<u>सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती रणवरे मॅडम यांच्यामार्फत</u>** :-

१) रेवती ही माझी पत्नी आहे. घटना ही सन २०१६ मध्ये अंदाजे सकाळी ७.३० वाजता घडली. घरी माझी पत्नी व सुन होते. मी बांदयाकडे गेलो होतो. घटना घडली तेव्हा मी घरी नव्हतो. मी घरी आलो तेव्हा पाहिले की माझ्या पत्नीला तीन लोकांनी हाताला, डोक्याला, नाकाजवळ, ओठाजवळ मार लागला होता. मी विचारले असता माझ्या पत्नीने मला सांगितले की, या तिघांनी तिला मारले. त्यांनी माझ्या पत्नीला कशानी मारले ते मला माहित नाही. माझी पत्नी बेशुध्द पडली होती. तिला आम्ही रामटेक दवाखान्यात नेले. तेव्हा आरोपीने म्हटले की, तु कसा नेतो व रिपोर्ट देतो हे आम्ही पाहून घेतो, तुझा मर्डर करु असे सांगितले. त्यानंतर मी तिला रामटेकला आणून पोलिस स्टेशला रिपोर्ट दिला. त्यानंतर परत दवाखान्यात नेले. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. मी आरोपींना ओळखतो. ते आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**
**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम.ए.गुप्ता यांच्यामार्फत</u>** :-

२) घटनेदिवशी माझी लहान मुलगा सागर हा नागपूरला भाजीपाला आणण्यासाठी सकाळी ७ वाजता गेला होता. काचुरवाहीहून नागपूरला जाण्यासाठी अंदाजे १.३० तास लागतो. दुसरा मुलगा विष्णु हा देखील त्याच्या डयुटीवर ७ वाजता गेला. मी घरी पोहचलो तेव्हा लोक जमा झाले होते. मी शेतावरुन ८-८.३० वाजता परत आलो. मी शेतावर पायी गेलो होतो. माझ्या शेतावर जाण्यास अर्धा तास व येण्यास अर्धा तास पायी लागतो. मला माझ्या पत्नीला मारल्याबाबतची सुचना मिळाल्यावर मी आलो असे घडले नाही. मी घरत परत आल्यावर मला माहीती झाली. माझ्या पत्नीला कशाने मारले हे मला माहित नाही. माझ्या पत्नीच्या हाताच्या बांगडया फुटुन हातात काच फसले होते. ते दवाखान्यात काढण्यात आले.

३) हे म्हणणे खरे नाही की, मी घरी आलो तेव्हा पाहिले की माझ्या पत्नीला तीन लोकांनी हाताला, डोक्याला, नाकाजवळ, ओठाजवळ मार लागला होता, मी विचारले असता

माझ्या पत्नीने मला सांगितले की, या तिघांनी तिला मारले, माझी पत्नी बेशुध्द पडली होती, आरोपीने म्हटले की, तु कसा नेतो व रिपोर्ट देतो हे आम्ही पाहून घेतो, तुझा मर्डर करु असे सांगितले, हे मी खोटे सांगत आहे.

४) मी घरी आलो तेव्हा पाहिले की माझ्या पत्नीला तीन लोकांनी हाताला, डोक्याला, नाकाजवळ, ओठाजवळ मार लागला होता, मी विचारले असता माझ्या पत्नीने मला सांगितले की, या तिघांनी तिला मारले, माझी पत्नी बेशुध्द पडली होती, आरोपीने म्हटले की, तु कसा नेतो व रिपोर्ट देतो हे आम्ही पाहून घेतो, तुझा मर्डर करु असे सांगितले, हे मी पोलिसांना बयाण देतांना सांगितले होते. परंतु ही बाब माझ्या बयाणात का नमुद नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या बयाण माझ्या सांगण्याप्रमाणे लिहले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी घरासमोरील जमा झालेल्या पाण्यामुळे पाय घसरुन पडली व त्यामुळे तिला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणीतीही घटना घडली नाही.

५) माझा मुलगा विष्णु याला माहिती मिळाल्यानंतर तो सरळ रामटेक येथील पोलिस स्टेशनला आला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे आरोपींच्या कुटुंबासोबत वाद असल्याने मी त्यांच्याविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>.**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

**श्रवणोत्तर स्वीकृत,** **माझे समक्ष,**

**सही/-**
**(डी. सी. वोराणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**कोर्ट नं.२, रामटेक**

**रामटेक.**
**दिनांक : १०/०३/२०२६.**

<u>नि.फौ.खटला क्र. ७५/२०१७</u>
<u>सरकार वि. शकुनतला</u>
<u>निशाणी क्र.४६ खाली</u>

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ५ ची साक्ष शपथेवर सुरु :-</u>**

**<u>नाव</u> : सोनु रविंद्र कोठेकर**
**<u>वय</u> : २८ वर्ष, <u>व्यवसाय</u> : शेतमजुरी**
**<u>राहणार</u> : काचुरवाही, रामटेक**

**<u>सरतपास शपथेवर सुरु</u>** :-
**<u>सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती रणवरे मॅडम यांच्यामार्फत</u>** :-

**१)** मी फिर्यादी व आरोपींना ओळखते. ते सर्व माझ्या घराजवळ राहतात. घटना सन २०१६ मध्ये सकाळच्या दरम्यान घडली होती. घटना काय घडली होती हे मला माहिती नाही. मी त्या दिवशी माझ्या कामावर गेली होती. पोलिसांनी माझे बयाण घेतले नव्हते.

**सरतपास पुर्ण.**
**<u>साक्षीदार अभियोग पक्षाला सहयोग करीत नसल्यामुळे उलट तपासाची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.</u>**
**<u>उलट तपास अभियोग पक्षातर्फे</u>**

**२)** हे म्हणणे खरे नाही की, दि.१०.०९.२०१६ रोजी सकाळी ७.३० ते ८ च्या दरम्यान आरोपींनी फिर्यादीला मारहाण करुन शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी नं.४ ने फिर्यादीच्या डाव्या मनगटावर वार केला, विटेवर डोके आपटले. आता मला माझ्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ वाचुन दाखविण्यात आला. तो पोलिसांनी का नमुद केला आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या शेजारी राहत असल्याने मी त्यांच्या विरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम.ए.गुप्ता यांच्यामार्फत</u>** :-

३) **उलटतपास नाकारले**
**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**माझे समक्ष,**
**सही/-**

**रामटेक.**
**दिनांक : १०/०३/२०२६.**

**(डी. सी. वोराणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**कोर्ट नं.२, रामटेक**